

श्री संत गजानन महाराज शेगांव यांची

# मानसपुजा

लेखक

कै. वासुदेवराव देव महाराज

(टेंभूर्णीकर)

।। श्री राम समर्थ ।।
श्री संत गजानन महाराज
यांची

# ।। मानस पुजा ।।

लेखक

**ह.भ.प. श्री वासुदेवराव देव महाराज टेंभुर्णीकर**

## ।। श्री राम समर्थ ।।

श्री गणेशाय नमः ।। श्री सरस्वत्येनमः ।। श्री गुरूभ्यो नमः ।। श्री गोपालकृष्णाय नमः ।। जय जयाजी गजवदना ।। ओंकारस्वरूपा गौरीनंदना ।। विघ्नहर्ता असूरमर्दना ।। गणनायका गणपते ।।१।। तुझे करिताची बाप्पा स्मरण । विघ्ने पळती रानोरान । या लागी ब्रह्मादी देवगण । कार्यारंभी तुज प्रार्थीती ।।२।। मी तो असे बुद्धीहीन । परि इच्छीत ऐसे माझे मन । की मानस पुजेचे विधान । शास्त्र संमतची लिहावे ।।३।। तू असशी बुद्धीचा सागर । शरण आलो मी तुज पामर । दयाघना तव कृपेचा कर । माझीया मस्तकी ठेवी ।।४।। तुझे ते आशिर्वचन घेऊन । आता वंदीन सरस्वती लागून । माये तू मज प्रसन्न होऊन । कार्यसिद्धी करावी ।।५।। माये तू जिव्हाग्री बैसून । रसाळ बोलवी निरूपण । तू जे का बोलविसी बोल म्हणून । तेची मी लिहीन निश्चये ।।६।। आमुच्या कुळीचे कुलदैवत । श्री नरसिंह असे विख्यात । स्तंभी प्रगटुनी हिरण्यकश्यपु दैत्य । वधीला जेणे सहजची ।।७।। त्याचा वरदहस्त असता शिरी । मग लेखनाची काय ती थोरी । म्हणुनीया तयाचे चरणावरी । मस्तक आजी ओपीले ।।८।। जयाचे उदरी पावलो जनन । ती माता पिता आता वंदीन । ज्याचेनि अमोल ऐशा नरदेहा येऊन । सुयोग ऐसा हा साधीला ।।९।। साध्वी सुंदराबाई माझी माता । प्रेमळ तैसा लक्ष्मण पिता । उभयतांचे चरणी ठेवुनी माथा । वंदन आजी केलेसे ।।१०।। आता वंदीन संत भाऊ प्रती । ज्याची कलीमाजी असे विशेष महती । नोहे ती प्रत्यक्षची पांडुरंग मूर्ती । दर्शन होता वाटे ।।११।। महाराष्ट्र भूमी ही पुण्यपावन । कितीएक संत

गेले येथेची होऊन । पैठणी एकनाथ देवगिरी श्री जनार्दन । गुरूशिष्य येथेची जाहले ।।१२।। बाळकृष्ण बनीमिया औरंगाबाद येथे । तैसेची तुकाराम नामदेवादी संत ते । महाराष्ट्रामाजी ऐसे कितीतरी झाले ते । नामे सांगावी कुठवरी ।।१३।। जालनापुरी अवलीया श्री रंगनाथ । शिर्डीस साईबाबा विख्यात । या परी अनेक अधिकारी संत महंत । उदया आले महाराष्ट्री ।।१४।। याच परंपरेमाजी अवलीया श्री गजानन । प्रगट जाहले शेगावी येऊन । वऱ्हाड प्रांती असे हे ठिकाण । समस्त सान थोर जाणती ।।१५।। या गजानन महाराजामुळे । शेगाव पुण्यपावन क्षेत्र जाहले । नित्य चोहीकडुन येती दर्शना सगळे । सान थोर सर्वची ।।१६।। परि मज अभाग्यासी । योग आला नाही तेथे जावयाशी । पुढे सहजासहजी बळेची मजशी । महाराजानेची नेले ।।१७।। तोच अल्पसा वृत्तांत । तुम्हा श्रोतयालागी सांगीन किंचीत । फाल्गुन मासी नाथ षष्टी निमित्त शेलगावी सहज मी गेलो ।।१८।। तेथील हरिभक्त शिरोमणी । चुन्नीलाल नामे चेचानी । ते अत्यंत माझे स्नेही । म्हणुन प्रेमादरे भेटलो ।।१९।। मज पाहता शेटजीस आनंद जाहला । म्हणती तुम्ही अगदी वेळेवर आला । उदयिक पैठणी नाथषष्टीला । शेगावची दिंडी जाईल येथून ।।२०।। तो दिंडीचा सोहळा पाहुनी । मगच जावे तुम्ही येथुनी । ऐसे ऐकता मज लागुनी । मनस्वी आनंद जाहला ।।२१।। श्री गजानन महाराजांची कृपा म्हणुनी । योग आला हो ऐसा घडुनी । मग दुसरे दिनी दिंडी सोहळा पाहुनी । परमानंद जाहला ।।२२।। चौरंगी मुर्ती होती स्थानापन्न । सकळांनी केले साष्टांग नमन । तोच शेटजी समवेत संचालक येऊन । आम्हा जवळी बैसले ।।२३।। मागुता शेटजी मजलागी म्हणती

। हेची व्यवस्थापक तेथीचे असती । निरपेक्ष सेवा करती । निष्काम मने सर्वदा ।।२४।। पुरूषोत्तम पाटील यांचे नामाभिधान । पाटील घराणे विख्यात पुर्ण । शेगावीच वंशपरंपरा वास्तव्य करून । श्रद्धायुक्त सेवा करताती ।।२५।। गजानन महाराजांची कृपा फार । प्रथम पासुनीची असे घराण्यावर । म्हणुनी हरी कुकाजी पासुनी आजवर । अखंड सेवा घडतसे ।।२६।। ओघानेची माझी ओळख संचालकासंगती । हे संत चरित्राचे सुप्रसिद्ध लेखक असती । सेवानिवृत्त होताची ती । संत चरित्रे यांनी लिहीली ।।२७।। निष्कामपणे गावोगावी संचार करून । प्रवचनादी करीती आपण होऊन । गहन विषय सुलभ करून । साक्षेपे सांगती समस्ता ।।२८।। ऐसे सांगुनी नाथ चरित्राच्या प्रती । काही दिधल्या संचालका हाती । म्हणती अनेक चरित्रे ती याच रिती । यांनी लिहीली आजवरी ।।२९।। एवढा संवाद होता पूर्ण । संचालकाने मज यावया दिधले आमंत्रण । मी ही शेगावी येईन म्हणुन । अविलंबेची बोलीलो ।।३०।। तो तात्काळची तीन दिवस निश्चीत करूनी । तारखा दिधल्या मजलागुनी । प्रेमादर तो एवढा पाहुनी । येतो म्हणुनी शब्द दिधला ।।३१।। ठरल्या दिवशी मी शेगावी पोहचुन । श्री गजानन महाराजांचे घेतले दर्शन । समागमे शिष्य तो लक्ष्मी नारायण । होता सहजचि दर्शना ।।३२।। तेथील सुंदर व्यवस्था पाहुन । तैसे पाटीलांचे निरपेक्ष मन । देखुनिया अंत:करण गेले हेलाऊन । धन्यवाद नकळत दिधला ।।३३।। किती सांगावा तेथील सोहळा । कितीएक अभिषेक करिती समाधीला । किती बैसती पारायणाला । प्रदक्षना घालती किती ते ।।३४।। प्रत्येकाची कामे होता यथास्थित । कोणी पसरिना कोणा पुढे हात ।

या परी लोक देखू नी समस्त । समाधान मानीती अंतरी ।।३५।। समस्ताचे करिता मुखावलोकन । समाधान ओसंडे मुखावरून । मुखी शब्द महाराज गजानन । देहभाव टाकुनी बोलती ।।३६।। समुदायाची नाहीच मिती । तळ समाधी कडे जाती येती । स्त्री पुरूषांच्या रांगा लागती । दर्शना निमीत्त सर्वदा ।।३७।। अखंड शब्द महाराज गजानन । सर्वामुखी येतसे आपण होऊन । आपण आहोत कोठील कोण । भान इतके नसेची ।।३८।। शांततेचा भंग कोठे जहाला । ऐसे देखीले नाही आम्ही डोळा । मग ब्रह्मानंद होता अंत:करणाला । नवल किंचित नसेची ।।३९।।

व्यवस्थापकाशी धन्यवाद देऊन । धन्य धन्य हे पाटीलाचे घराणे म्हणुन । ऐशी निरपेक्ष सेवा कोठेही अवलोकन । केली नसे आजवरी ।।४०।। तोची माझे मनी वासना उदभवली । की आपणही पुजावी गजानन माऊली । परि सामुग्री ती नसे मज जवळी । केवी घडावे हे कळेना ।।४१।। याच विचारी असता मी निमग्न । अवचित पुरूषोत्तम पाटील तेथे येऊन । निजकरी माझा हस्त धरून । निजस्थाना घेऊनी गेले ।।४२।। निजासनी स्थानापन्न होऊन । मज दाखवली पुस्तके आणुन । जी स्तोत्रे स्तुती पाठ हिंदी मराठीतुन । लिहिली असे अनेकांनी ।।४३।। ते वाङमय पाहताची उत्तम उत्तम म्हणुनी । परत केली पाटीलालागुनी । तोचि पाटील म्हणती इच्छा एक असे मनी । की मानस पुजा असावी ।।४४।। तरी मानस पुजा लिहुन । द्यावी आम्हासी पाठवून । म्हणजे आपले ही काही लिखाण । संस्थानी राहील सर्वदा ।।४५।। पाटीलांच्या त्या ऐकुनी वचना । आनंद जाहला माझीया मना । पाटीलांची नोहे ही गजानन महाराजांची आज्ञा । समजुनी होकर दिधला ।।४६।। पुजा करावी म्हणुनी होते चिंतीले । परि सामग्रीविण मज नाही ते रूचले । आता मानस पुजेचे सामर्थ्य असे आगळे । अक्षय अखंड सर्वदा ।।४७।। मानस पुजेचे वैशिष्ट पाही । सामुग्रीची त्या आवश्यकताची नाही । सामुग्रीविण उपचार सर्व काही । मानसीकची कल्पुनी अर्पावे ।।४८।। गुरू चरित्र याचे असे प्रमाण । सुज्ञे ओळखावे ते आवर्जुन । सदतीसावा अध्याय पाहावा वाचुन । मग संशय नुरेची अंतरी ।।४९।। मानस पुजा लिहावया जाहले ते कारण । त्याचे तुम्हालागी केले प्रास्ताविक वर्णन । आता पूजेचे प्रकार पुर्ण । चित्त देऊनी परीयेसा ।।५०।।

## (पुजेचे प्रकार)

## (पंचायतन) :- श्लोक

आदित्यं गणनाथंच देवीं रूद्रंच केशवम् ।। पंचदैवतमित्युक्तं सर्व कर्मसु पूजयेत् ।।

ऐशी असती पंच दैवते । या व्यतिरिक्त नसे अन्य कोणते । जरी का दिसती आपणा अनेक ते । परी पाचातची समावेश समस्त ।।५१।। वेताळ म्हसोबा आसरा पाही । खंडोबा आदी दैवते सर्वही । या पंच दैवताहुनी वेगळी नाही । विचारेची पहावे ।।५२।। यासची म्हणती पंचायतन । शिवार्क विष्णु गजानन । आदी शक्ती जगन्माता जाण । पाचवे दैवत येथीचे ।।५३।। परस्परा दिसती आम्हा ही भिन्न । परि पांचही पाहता असती अभिन्न । तरी ब्रह्मदृष्टी ती जहालीया विण । सर्वथाही कळेना ।।५४।। व्यक्ती तितुक्या प्रकृती । म्हणुनिया दैवताची मांडणी या रीती । ज्ञान दृष्टी होता मग अभिन्न स्थिती । सहज साधे समस्ता ।।५५।। जैसे का बाराखडच्या प्रथम शिकविती । मग वाक्यरचना कैसे ती सांगती । शेवटी पुस्तकाचे धडे देती । क्रमाक्रमाने च यापरी ।।५६।। ही पाहिली व्यवहाराची रिती । आता दृष्टी देऊ परमार्थी । श्री समर्थ रामदासांनी आपली कृती । दोहा एक देऊनी मांडलीसे ।।५७।।

## दोहा

उत्तमा सहजावस्था, मध्यमा ध्यानधारणा । अधमा प्रतीमा पूजा । तीर्थयात्राधमाधम:

नरदेहाचे अंतीम ध्येय पाहता । स्वस्वरूपाचे ज्ञान व्हावे तत्वता । तेणेची लाधे सहजावस्था ।

समर्थाने जी कथीयली ।।५८।। हेची जरी सत्य मानावे आपण । मग कासया पाहिजे पुजा आणि ध्यान । तैसेची तिर्थयात्रा अधमाधम म्हणुन । आटाआटी पाहीजे कासया ।।५९।। तरी आता दोह्याचे करू संशोधन । उफराटा अर्थ घेऊ आपण । प्रथम घ्यावे तिर्थाटन । तरिच संगती लागे दोह्याची ।।६०।। अधमाधम सांगितले तिर्थयात्रे प्रती । प्रतिमा पुजन ती अधम म्हणती । मध्यम सांगितली ध्यान रिती । सहजावस्था उत्तम ।।६१।। आता खालुन घेऊ उफराटा अर्थ । म्हणजे उलगडा होईल समस्त । मग मन होईल संशय रहित । सत्य सत्य त्रिवाचा ।।६२।। तिर्थयात्रा अधमाधम म्हणती । प्रथम तीच करावी यथा पद्धती । म्हणजे नाना तिर्थ करिता नाना मुर्ती । दैवते कळो येतील ।।६३।। वाराणशीस जाता मृडाणीपती । पंढरीस दिसे तो रूखमीणीपती । अयोध्येसी जाता सितापती । कृष्णमुर्ती दिसे त्या गोकुळा ।।६४।। माहोरगडी जगज्जननी । तुळजापुरी तुळजाभवानी । ऐशा रिती तिर्थकरिता अनेकांनी । मुर्ती ज्ञान होईल आपणां ।।६५।। मुर्ती ज्ञान ते जाहल्यावरती । सहजी मुर्ती पूजा करावी वाटे चित्ती । मग आलो आपण अधम वर्गाप्रती । मुर्ती पुजा कराया ।।६६।। मुर्ती पुजा करावी मनापासुन । म्हणजे मध्यम वर्गाचे ते साधे ध्यान । मग अधमातुन मध्यम वर्गा येऊन । पोहोचली म्हणुन समजावे ।।६७।। ही ध्यान धारणा समाधी पूर्ण । म्हणजे सहजावस्थे माजी एक आपण । हीच सजावस्था उत्तम म्हणून । समर्थाने कथीयेली ।।६८।। परि एवढी ठेवावी दक्षता । पुनरपी फिरावे मागे आता । स्वस्वरूपी एकदा स्थीर होता । कार्यसिद्धी जहालिसे । या परि करिता विवरण । साशंकित होती श्रोते जण । म्हणती दरिद्रयांने हे

तिर्थाटण । केवी करावे हे कळेना ।।७०।। सामर्थ्य पाहिजे तिर्थयात्रेशी । द्रव्याविणन घडे प्रयाग काशी । मग गरिबालागी गती कैशी । नरदेही येऊनीया व्यर्थची ।।७१।। तरि ऐकावे आता चित्त देऊन । पुराणादी ग्रंथाचे करावे श्रवण पठण । मग नाना मुर्तीचे होईल ज्ञान । ठायीच बैसोनी समस्ता ।।७२।। अनेक मुर्तीचे ते होता ज्ञान । मग जी का रूपे घ्यावी आपण । तीच आपल्या मंदीरी स्थापुन । त्रिकाळ पुजन करावे ।।७३।। प्रतिमा पुजन केल्याविण । ध्यान धारणा साधणे असे कठिण । या लागी अंगेची करावे नित्य पूजन । श्रद्धा ठेवुनी मानसी ।।७४।। पूजेचे विशेष महत्त्व आहे म्हणून ।। श्रुती शास्त्रे सांगती आवर्जून । पुजेविण जो सेवी अन्न । त्या अधोगती होय निश्चये ।।७५।। समाज तो पहावा एकसारिखा नसे । विषमता ती चोहिकडे दिसे । यालागी अनेक प्रकार पुजेचे तैसे । सांगुनिया ठेविले आधिच ।।७६।। प्रथम षडषोपचार पुजा करावी । ती न साधीता पंचोपचार घ्यावी । परी पुजा कर्म करिता अंतरी असावी । श्रद्धा पुर्ण सर्वदा ।।७७।। श्रद्धेविण कोणतेही कर्म करीता । तो व्यर्थची शिण मानावा वृथा । उपचारामाजी जरी न्युनाधिक होता । तरी बाधा नसे किंचित ।।७८।। गंध अक्षता गुलाल बुक्का जाण । धुप दिपादी आसन वसन । नैवेद्यादी दक्षीणा आदी साधन । व्यवहारिक हे उपचार सर्वथा ।।७९।। भक्ती श्रद्धा आदी साधने । परमार्थाची असावी आवश्यकपणे । जी समस्ता लागी त्या श्रीहरीने । देऊनीया ठेवीली आधीच ।।८०।। त्याचा उपयोग करून घ्यावा आपण । ना तरी येऊनी नरदेहा मग पशुसमान । पुन्हा मागुता त्या जन्ममरण । कदाकाळी चुकेना ।।८१।। व्यवहारिक उपचार हे सोडा साबु परी ।

परमार्थीक श्रद्धा भक्ती हे निर्मळ वारी । उभय साधने असता कार्य निर्धारी । सहजा सहजी साधेल ।।८२।। समजा एखाद्याने नाना प्रयत्न करूनी । षोडषोपचार सामग्री आणली मेळउनी । परी भक्ती श्रद्धा नसे अंत:करणी । तरी व्यर्थ जाणा सहजची ।।८३।। जैसे उत्तम बीज आणीले निवडुनी । खोलवर पेरिले त्या शेती । परी ओलाव्याविण श्रम ते व्यर्थ जाऊनी । अंकुर त्या फुटेना कदाही ।।८४।। किंवा सोडा साबु आदि पदार्थ । वस्त्रे धुवाया आणिली समस्त । परि पाण्याविण हे सर्व व्यर्थ । मलिनता काढता नयेची ।।८५।। आणि समजा पाणि आहे बहुत जेथे । परि सोडा साबु नाही तेथे । तरि या विण आडकाठी नये येथे । वस्त्रे धुऊनिया निघतील ।।८६।। व्यवहारिक उपचार न्युन्याधिक जरी । तरि ते चालेल सर्वतो परि । परि श्रद्धा भक्ती पाहिजे अंतरी । तेणेची पुर्णता येईल ।।८७।। व्यवहारिक उपचाराची नरदेही महती । परि अंतरी पाहिजे श्रद्धा भक्ती । तेणे कार्यसिद्धी होईल निश्चीती । विश्वास मानसी असु द्या ।।८८।। इतकेचि नोहे एकएक उपचारा प्रती । फलश्रुती सांगितली आहे शास्त्र ग्रंथी । तितुक्याची सविस्तर माहीती । देऊ तुम्हासी क्रमाने ।।८९।। परि कर्म करिता पाहीजे मनाचा मेळ । मेळ नसता साधने होती फोल । म्हणुनी या मानसीक पुजेचे बळ । अधिकाधिक वर्णीले ।।९०।। कोणी एखादा म्हणेल जरी । मज पाशी आहे पुजा सामग्री । परि सवड न मिळे गृहाभितरी । पुजा कर्म करावया ।।९१।। ऐशीयाने ती पुजा सामग्री घेऊन । पुजा करणाऱ्यासी द्यावी नेऊन । पुजा फळ त्याशी मिळे संपुर्ण । शास्त्र संमत असे हे ।।९२।।

प्रमाण - (दद्यात् अर्चन साधनम्)

हे ही कठिण वाटे जरी कवणाते । तेणे जावे पुजा जाहली असेल तेथे ।
दर्शना करीता पुजा फल त्याते । प्राप्त होईल निश्चये ।।९३।।

प्रमाण - (कुर्यादर्चन दर्शनम्)

किती एक म्हणती हे केवी घडावे । नित्य दर्शना कैसे जावे ।
याही सकळ जनाते संतुष्ट राखावे । पुजा फल लाभे सहजची ।।९४।।

प्रमाण - (संतोषम् जनयेत् प्राज्ञते देवेश्वर पुजनम्)

यापुढे आणखी सुलभ उपाय म्हणुन । शास्त्रामाजी सांगितला तो विषद करून । परी कोणताही उपाय योजीता निर्मळ मन । आचरणा माजी असावे ।।९५।। ज्या कर्मी अनूकुल नाही मन । मग कर्म करूनीयां न केल्या समान । मना वेगळे कोणतेही कर्म म्हणून । पुर्णता न पावे सर्वथा ।।९६।। पुजा साहित्य न मिळे अनेका पुर्ण । हे स्वाभाविकपणे येतसे घडुन । म्हणुनिया त्याने पुजा अर्चन । सोडु नये सर्वथा ।।९७।। जयापासी जो उपचार असे म्हणून । त्याही तेणेची करावे श्रीहरी पुजन । त्याचे फळ त्यासी मिळोन । कुतार्थ होईल निश्चये ।।९८।। चंदन साहित्यची असे ज्या पाशी । त्याने गंधची अर्पावे श्रीहरिशी । त्याशी पुण्य होय अपारेशी । श्रुती संमत असे हे ।।९९।।

**प्रमाण - (गंधात् पुण्यमवाप्यते)**

जरी का असे पुष्प एखादे जवळी त्याने तेच अर्पावे वनमाळी । वृद्धी होईल आयुष्या आगळी । सत्य सत्य जाण पां ।।१००।। प्रमाण - (आयुर्वृद्धी पुष्प दानात) उदबत्ती असता तेवढीच लाऊन । धुपे ओवाळावा तो जगज्जीवन । नित्य धुप देता अपार धन । प्राप्त होय निश्चये ।।१०१।।

प्रमाण - (धुपादमिहा श्रुते)

जरी कार्थ दिपची आहे आपणा पाशी । तो दिपची ओवाळावा त्या ऋषीकेशी । तेणे साधक होईल ज्ञानराशी । अनुभव घेऊनी पहावा ।।१०२।।

प्रमाण - (दिपज्ञान मनाप्नोती)

नित्य जे का नैवेद्य समर्पिती । त्यायोगे संतोष पावे रूख्मीणी पती । उत्तमोत्तम ती भोगाची प्राप्ती । सहज होय साधका ।।१०३।। प्रमाण - (नैवेद्यात भोगमुत्तमम) इतुके जरी केले सविस्तर वर्णन । तरी न होय मनाचे समाधान । कारण तया येतसे दिसोन । पराधिनता सर्वत्र असेची ।।१०४।। पराधिनता ही जाईल कवणे परी । हेची शोधावे आपले अंतरी । तरी शास्त्राभ्यास करावा खोलवरी । तेणेच होईल हा उलगडा ।।१०५।। तस्मात शास्त्र प्रमाण ते । गीता वचन असे समस्ताते । म्हणुनिया करावे संशोधनाते । या आधारे सर्वत्र ।।१०६।। ब्दैताग्ब्दैताचे करिता संशोधन । अब्दैतची तत्व घ्यावे आपण । अद्वैत तत्व घेता मग कोणी कोणाचे पूजन । करावे प्रश्न येतोची ।।१०७।। यालागी अद्वैत भाव ठेवुन । द्वैताधारेची करावे पुजन । क्रिया अद्वैत नसावी कधी म्हणून

। वर्तता असता संसारी ।।१०८।। देहभाव जयाचा मावळला । तोची जिवनमुक्त जाहला । देव पुजादी कृत्ये त्याला । काही करणे नलगेची ।।१०९।। या तत्वावरी परा पुजा आधारीत । ती पाहु आता आपण देऊनी चित्त । पुरविण्या आपुला मनीचा हेत । मार्ग निघतो पाहुया ।।११०।। परेच्या पलिकडे जे का वसे । ते केवळ शुद्ध ब्रह्मची असे । तेथे उपाधी विकार काहीच नसे । अद्वैत तत्व केवळ ।।१११।। ते सर्वाठायी असे ओतप्रोत । त्याविण रिता ठाव नसे किंचित । इंद्रीय विकारादी उपादी रहित । असे केवळ शुद्ध ब्रह्म ।।११२।। जे स्वयं शुद्ध प्रकाशित । सदा सर्वदा असे नित्य तृप्त । निर्लेप असुनी सर्वाठायी अलिप्त । स्वयंसिद्ध असे जे ।।११३।। स्वर्ग मृत्यु पाताळाशी । आधिष्ठान ब्रह्मची असे हे त्याशी । शास्त्रामाजी विवर्तरूप बोलीले यासी । परा पुजा ही त्याचीच असे ।।११४।। विवर्तरूपाचा थोडा विचार । येथे करू आपण साचार । रज्जुवरी सर्प थोर । भासमान होय ज्यापरी ।।११५।। तेवी जगद्भान होतसे आपणा लागुन । परि ब्रह्मची केवळ त्या अधिष्ठाण । म्हणुनिया ब्रह्मसत्य जगन्मीथ्या ऐसे वचन । श्रुती माजी घातीले ।।११६।। ऐसी असता ब्रह्म स्थिती । पुजेची लावावी कैसी संगती । त्याविण रिता ठाव नसता कोणे रिती । आवाहन त्या कोठुन करावे ।।११७।। सर्वाधार म्हणती ज्याशी । त्या आसन कैसे द्यावे बैसावयासी । स्वयंशुद्ध असे जो त्यासी । अर्ध्यपा केवी द्यावे ।।११८।। निर्मलत्व पुर्ण जेथे वसे । तेथे स्नान तरी घालावे कैसे । निर्लेप असता गंध तैसे । कवणे परि त्या लावावे ।।११९।। नित्य तृप्त जो का म्हणवी आपण । या नैवेद्य केवी दाखवावा आणुन । स्वयं प्रकाश असता त्या निरांजन । केवी ओवाळावा

म्हणतसा ।।१२०।। ऐसे व्हावया काय कारण । तरी अधिष्ठानाचे नसे आम्हा दर्शन । दर्शनाविण ब्रह्म दृष्टी यावी कोठुन । दृष्टीविण समता नयेची ।।१२१।। जीव नरदेहासी आला । उपाधी रहीत कैसे म्हणावे त्याला । उपाधीविण त्या आत्म्याला । जीवम्हणता नयेची ।।१२२।। अष्टपाश असती आत्म्याभोवती । म्हणोनिया तयासी जीव म्हणती । पाश गेल्याविण स्वस्वरूप स्थिती । प्राप्तनोहेची कल्पांती ।।१२३।। घृणा, लज्जा, भय आणि शंका । चार पाश असती हे देखा । जुगुप्सा कुलशिल ज्ञाती ऐका । मागुता चार पाश हे कथियेले ।।१२४।। या अष्ट पाशांचे बंधन । जोवरी असे आत्म्यालागुन । तोवरिच जीव हे नामाभिधान । एरवी शिवस्वरूप तो असेची ।।१२५।। हीच स्वरूप स्थिती प्राप्त व्हावी म्हणुन । नित्य भजन पूजनादी करावे आपण । प्रयत्न करावा चिकाटी करून । मागुता शरण जावे संताशी ।।१२६।। संत महात्मे दयाळु असती । संशयरहित करितील तुम्हाप्रती । ज्या योगे स्वरूपस्थिती । तुम्हा ती लाधेल सहजची ।।१२७।। ऐसा अधिकार नसे आणिकाशी । ब्रह्मा विष्णु महेशासी । म्हणोनिया संताची महती एशी । श्रुती शास्त्रादिक वर्णिती ।।१२८।। संत अद्वैतपणे वर्तती । शत्रु मित्र समान मानीती । मानापमानाची त्या नसे खंती । द्वैता वावेतो नसेची ।।१२९।। ब्रह्मा विष्णु महेशाशी । मायेची उपाधी असे त्याशी । म्हणुनीया द्वैत भावाविण तयाशी । व्यवहार करिता नयेची ।।१३०।। द्वैताश्रये करून । ईश्वराचे जरी का घडे वर्तन । परि त्याच्या ईश्वर तत्वाशी नये उणेपण । नियम हा श्रुती संमत असे ।।१३१।। याच रिती जिवन्मुक्त होता प्राणी । शुभाशुभ तो नाणी मनी । पाप पुण्याशी ना कधी गणी । कर्तव्य मुक्त तो

जहाला ।।१३२।। जे जे घडे ते प्रारब्ध म्हणुनी । पृथकचि राहे त्या पासोनी । जेवी पादप हालणे वायुचेनी । मुक्त लक्षण ते या परी ।।१३३।। असो जीवाशी मिळता मनुष्यजन्म । त्या प्रत्येकी अवश्य असे पुण्य कर्म । यथा सामर्थ्य जाणुनिया पुजेचे वर्म । सार्थक करावे स्वयेची ।।१३४।। सामर्थ्य असे जयाचे जैसे । पुजा कर्म करावे त्याने तैसे । म्हणुनिया पुजेचे प्रकार ऐसे । पृथक् पृथक् कथीयेले ।।१३५।। निज सामर्थ्य ओळखुन । जी पूजा वाटे तुम्हा सुलभ म्हणुन । तीचाच अंगीकार करूनी आपण । सद्भाव ठेवोनी करावी ।।१३६।। किती एक षोडशोपचार पुजा करीती । किती पंचोपराचि घेती । पुष्प धुपादि साधने जी जवळी असती । ती श्रद्धायुक्त अर्पीती किती ते ।।१६७।। परि फलश्रुती होय ती सारीखी समस्ता । शंका न घ्यावी आपुल्या चित्ता । श्रीहरी असे सकळांचा त्राता । हे विसरू नयेची सर्वथा ।।१३८।। जितुके प्रकार पूजेचे पाहीले आपण । ते समस्ताशी करता येणे अशक्य म्हणुन । आता ऐसी पुजा सांगेन तुम्हा लागुन । जी समस्ता सुलभ सहजची ।।१३९।। या मानसीक पुजे करीता । साहित्याची नसे आवश्यकता । परि मनाचा मेळ असावा कर्म करिता । तरीच कार्य साधे ।।१४०।। भाव भक्ती श्रद्धा निर्मळ मन । ही सामग्री मानस पुजे कारण । असावी तुम्हा ती आधीच देऊन । ठेवीली असे श्रीहरीने ।।१४१।। कमी अधिक प्रमाणात । सामग्री दिधली तुम्हा समस्त । त्याचा अभ्यास करूनीया सतत । साध्य ते घ्यावे साधुनी ।।१४२।। षोडषोपचार पंचोपचार जितुकी का असती साधन । तितुकी घ्यावी मानसी करवुन । श्रद्धा युक्त साधने करावी करावी अर्पण । सद्भाव ठेवुनी अंतरी ।।१४३।। जो जो उपचार

मानसी । अर्पण केलिया तो पावे देवाशी । म्हणुनीय मानस पुजेशी । महत्व असे आगळे ।।१४४।। मनोमय मुर्तीचे आवाहन करून । मनोमय उपचारेची करावे पूजन । नसे कष्ट नको द्रव्य जाण । मानस पूजा सुलभ ऐसेनी ।।१४५।। श्रीमंत अथवा दरिद्री जाण । अंध पंगु वा मती हीन । समस्ता लागी हे मानस पूजा विधान । निश्चीत साधे सहजची ।।१४६।। तरी आता मानस पूजा करून । दैवताशी करून घ्यावे प्रसन्न । परी ब्रह्म लिखीत ना टळे ते आणिका कडुन । एक संत भक्ता वाचुनी ।।१४७।। दैवते असती संताधीन । ऐसे आहे श्रीहरी वचन । म्हणुनीया इच्छी श्रीहरीचे मन । संत सेवाती घडावी ।।१४८।। संत जेजे का ओळती । श्रीहरी करितो त्याची पुर्ती । ऐसी आहे संताची ख्याती । म्हणुची संतची पूजावा ।।१४९।। आठव होता संताचा मनी । गजानन महाराजचि दिसो लागले नयनी । धन्य धन्य ते शेगाव पुण्यभुमी म्हणोनी । अधिकारी संत प्रगटला तो येथेची ।।१५०।। दैवी सामर्थ्य असे जयाचे आवळे । समस्ता लागी अनुभवा आले । शुष्क विहीरीस पाणी आणिले । काठोकाठ भरीली क्षणार्धेची ।। पशु सारीखे मतीहीन प्राणी । गाय अश्वादी शितविले स्पर्शे करूनी । नैनं दहती पावका : म्हणता वन्ही चतेवाणी । चकित केले त्या बैराग्या ।।१५२।। असो पूर्णब्रह्म श्री संत गजानन । मी अज्ञानी असे बुद्धीहीन । केची करावे तुझे स्तवन । हे तो कळेना मजलागी ।।१५३।। तू ब्रह्मांडनायक असुनी । मनुष्यरूप दिसतोशी आम्हा लागूनी । अशक्यप्राय ते शक्य करोनी । समस्ता लागी दाविले ।।१५४।। जरी असे मी बुद्धीहीन । तरी इच्छित ऐसे माझे मन । की पूजा समपांवी तुज लागून

। मानस उपचारेचि समर्था ।।१५५।। आवाहन करी मी ध्यानस्त होऊनी । आसन घालीन अंगेचि मेदिनी । जीवन हेची निर्मळ पाणी । घेऊन अर्घ्यपाद्यादी देईन ।।१५६।। यत्पुरूषेण मंत्रेसी । स्नान घालीन मी तुम्हाशी । पंचज्ञानेंद्रियाये पंचामृत तुजशी । अर्पीन आजी समर्था ।।१५७।। अहंकाराचे घासुनी चंदन । तुमचे भाळी मी ते लावीन । भाव भक्तीची पुष्पे आणून । अर्पिन मी तुम्हाशी समर्था ।।१५८।। वासनेचे बीज जाळुनी । धूप दिला मी तुम्हा लागुनी । सद्बुद्धीते पुढे सारूनी । दीप तुज पुढे लाविला ।।१५९।। देह भाव सांडून । नैवेद्य केला मी तुज अर्पण । पंचप्राणाच्या वाती लावून । आरती केली स्वानंदे ।।१६०।। आता सर्वची विकार गेले म्हणून । मग उरले कोठे दुजेपण । जीवाचे गेले जीवपण । शिव होऊन बैसला ।।१६१।।

**इतिश्री गजानन मानस पूजा श्री ब्रह्मांडनायक संत गजानन महाराज यांचे चरणी सादर समर्पण .....गोपालकृष्णं भगवान की जय ।।**